माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १५२/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. रियाज मस्तान शेख**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,**
सांताक्रुझ विभाग, सांताक्रुझ् स्टेशन, १ ला मजला, जुहू गार्डनसमोर,
लिंकिंग रोड, सांताक्रुझ (प) मुंबई -५४.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-९)**
हिल रोड, बांद्रा (पश्चिम), मुंबई – ५०.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २५.०३.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००२९७२ प्रकरणी आयोगाने दि.१९.०४.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेले द्वितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून रुपांतरित करण्यात येत आहेत."*

२. उक्त आदेशाच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सांताक्रूझ विभाग, सांताक्रूझ पोलीस स्टेशन सांताक्रूझ (प), मुंबई यांच्याकडून दि. २७.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागितला.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्या कार्यालयात सदर प्रकरणाबाबत अभिलेख उपलब्ध नसल्याने त्यांनी आयोगास अभिलेखाची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली.

४. सुनावणी दरम्यान सदर प्रकरणाबाबत आयोगाच्या अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणाबाबत वस्तुस्थिती सादर करण्याकरिता आणखी वेळेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे, सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्ररणी पुढील सुनावणी दि. ०९.०४.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

२५-३-२०२६

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २५.०३.२०२५**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १५२/२०२१**
**तक्रारकर्ता श्री. रियाज मस्तान शेख**
**सुनावणी दिनांक : ०९.०४.२०२६ (In continuation of order dt.२५.०३.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.०४.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित(प्रतिनिधी) |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाच्या अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणाबाबत वस्तुस्थिती सादर करण्याकरिता आणखी वेळेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल असे आयोगाने आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणी वेळी तक्रारकर्ता सुनावणी नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०८.०४.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, सदर प्रकरणी जुहू पोलीस ठाणे, मुंबई, वि. स्था.गु. नोंद क्र. ११४/२०१७, कलम ५२(४३) एम.आर.टी.पी. कायदा अन्वये दाखल गुन्ह्याचे दोषांरोपपत्र मा. महानगर दंडाधिकारी, एम.आर.टी.पी. ५५ वे न्यायालय, विलेपार्ले पश्चिम, मुंबई येथे कोर्ट केस क्र. १८/पी. डब्लू/२०१९, दि. २६.०८.२०१९ दाखल केलेले होते. सदरील गुन्हा दोषमुक्त असल्याचा मा. न्यायालयाने निकाल दिलेला आहे.

तसेच जन माहिती अधिकारी संबंधीत न्यायालयाकडून जुहू पोलीस ठाणे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेस आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्याकामी लिहिलेले पत्र दि. ०८.०६.२०१९ रोजीची प्रत आयोगास सादर केली.

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.०६.२०१९ रोजीची प्रत तात्काळ तक्रारकर्ता यांना नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**उक्त विवेचनासह तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : १५.०४.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**